# मराठी विभाग

## (स्थापना -१९९९)

**विभागाची माहिती**

मराठी विभागाची स्थापना १९९९ साली करण्यात आली. बी.ए.,बी.कॉम.बी.एस्सी च्या विद्यार्थ्यांना भाषा व वाङ्मयाचे ज्ञान देणे, त्यांना लेखन कौशल्य,वाचन कौशल्य व संभाषण कौशल्य शिकविण्याचे कार्य या विभागांतर्गत केले जाते. वाङ्मयाच्या विद्यार्थ्यांना विविध वाङ्मय प्रकारांची माहिती देऊन त्याची वाङ्मय विषयक रसिकता वाढविली जाते. भाषा हे संस्कृतीसंवर्धनाचे माध्यम आहे.भाषेच्या माध्यमातून उपयुक्त सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांचे संवर्धन करण्याचे महत्वपूर्ण कार्य हा विभाग करतो.यासोबतच व्यक्तिमत्व विकास,स्वयंरोजगारात्मक शिक्षण,विद्यार्थ्यांच्या कला गुणांचा विकास इ. बाबीकरिता विभाग विशेष प्रयत्नशिल आहे.

**विभागातील कार्यरत प्राध्यापक**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रा.डॉ.शिवाजी नी.नागरे | सहा.प्राध्यापक व विभाग प्रमुख | पूर्णवेळ |
| २) | प्रा.डॉ.श्रीकृष्ण गो.काकडे | सहा.प्राध्यापक | पूर्णवेळ |

**विभागातील नियमित उपक्रम**

१) भित्तीपत्रक २) सेमिनार ३) प्रश्नमंजुषा ४)ग्रंथालय भेट ५)शैक्षणिक सहल

**विभागातील बृहत् संशोधन प्रकल्प (Major Research Project)**

१) यु.जी.सी.नवी दिल्ली पुरस्कृत बृहत् संशोधन प्रकल्प (Major Research Project) ''महाराष्ट्र व मध्यप्रदेश यांच्या सीमेवरील कोरकूचा सांस्कृतिक अभ्यास'' रुपये ५,७२,२००/- मंजूर .

२) ''मराठीतील समस्याप्रधान कादंबरी : स्वरुप व संकल्पना'' या विषयावरील रुपये १०,३१,२००/- चा बृहत् संशोधन प्रकल्प (Major Research Project) यु.जी.सी.नवी दिल्ली ला सादर.

**विभागातील मागील वर्षातील (२०१०-११)उपक्रम**

१) भाषा व वाङ्मय उद्घाटन कार्यक्रम - दि.८ऑगस्ट २०१०रोजी करण्यात आले या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून प्रा.पृथ्वीराज ठाकूर हे होते तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जगदीश साबु हे होते.

२) मुलाखात- श्री बाबाराव मुसळे यांची दि. ४ जाने २०११ रोजी प्रकट मुलाखत घेण्यात आली.

३) दि.१३,१४ व १७ जानेवारी २०११ रोजी आंतरवर्गिय व आंतरविषयावरील सेमिनार स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

३) मराठी विभागाच्या वतीने दि. १०/१०/२०१० (रविवार) रोजी मुक्तागिरी, चिखलधरा येथे अभ्यासविषयक सहलीचे आयोजन.

**मराठी विभाग उपक्रम (२०११-१२)**

सत्र २०११-१२ या दरम्यान मराठी विभागाच्या वतीने विविध उपक्रम व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थ्याच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टिने गटचर्चा,निबंध स्पर्धा,सेमिनार,प्रश्नमंजुषा,स्पर्धा परीक्षा समुपदेशन, क्रीडा विषयक मार्गदर्शन आयोजित केल्या गेले.

**ग्रंथालय भेट :-**

१. दि.१९/८/२०११ रोजी सीताबाई कला महाविद्यालय,अकोला येथील ग्रंथालयाला मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांची **'ग्रंथालय भेट'** कला महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे प्रमुख प्रा.भास्कर धारणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आयोजित करण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांना मराठी संदर्भ ग्रंथ, विश्वकोश,संज्ञा संकल्पना कोश,मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे खंड,साप्ताहिके,मासिके,व्दयमासिके,त्रयमासिके,इ.ची ओळख करून देण्यात आली. यावेळी सीताबाई कला महाविद्यालयाच्या

श्रोतुगृहात ग्रंथपाल श्री.अशोक सोनोने यांनी आज ग्रथवाचकांची संख्या झपाट्याने घटत असलयाबद्दल चिंता व्यक्त करुन विद्यार्थ्यांनी ग्रंथाच्या वाचनाने आपले जीवन समृदध केले पाहिजे असे सांगितले. यावेळी सीताबाई कला महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा.भास्कर धारणे हे उपस्थित होते. त्यांनी महाविद्यालयाने आयोजिलेल्या ग्रंथालय भेटीच्या आयोजनाबाबत मराठी विभागाचे कौतुक केले व आपलया मराठी विभागाची माहिती दिली.

**वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन :-**

२. दि.३/९/२०११ रोजी मराठी वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन करण्यात आले.श्री कृष्णकांत तिवारी हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

**प्रश्नमंजुषा :-**

३. दि.२०/१२/२०११ रोजी कला शाखेच्या वतीने आयोजित प्रश्नमुजुषा स्पर्धेत मराठी विभागाच्या विद्यार्थ्यानी सहभाग नोंदविला.

**कार्यशाळा :-**

४. मराठी विभागाच्या वतीने दि.२१ जानेवारी २०१२ रोजी मोहरीदेवी खंडेलवाल कन्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थीनींकरिता 'मराठी लेखन व उच्चारण समृध्दी कार्यशाळेचे ' आयोजन करण्यात आले.यावेळी विभाग प्रमुख डॉ.नागरे यांनी विद्यार्थीनींना ऱ्हस्व दीर्घासंबंधीचे नियम सोप्या पध्दतीने सांगितले. तर डॉ.रावसाहेब काळे यांनी विरामचिन्हांचे नियमांची माहिती विद्यार्थीनीना करुन दिली. यावेळी विद्यार्थीनींचा मोठ्या संख्येने सहभाग लाभला.

**जिल्हास्तरीय सेमिनार स्पर्धेचे आयोजन व सहभाग**

५. दि.२४/१/२०१२ रोजी कला शाखेच्या वतीने आयोजित 'जिल्हास्तरीय सेमिनार स्पर्धे'त मराठी विभागाच्या १२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. व ३ पारितोषिके पटकाविली.

**स्नेहसंमेलनात सहभाग :-**

६. महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन दि.२४,२५ व २६ जानेवारी २०१२ ला आयोजित करण्यात आले. यामध्ये मराठी विभागाच्या विद्यार्थ्यानी तीन वेगवेगळ्या स्पर्धामध्ये सहभाग नोंदविला.

७. मराठी विभागाच्या शिक्षकांनी विविध चर्चासत्रे,सेमिनार मध्ये सहभाग नोंदवून पेपरवाचन केले.

**पुस्तक प्रकाशन :-**

८. मराठी विभागाच्या वतीने मागील वर्षी डॉ.श्रीकृष्ण काकडे यांचे 'समकालीन ग्रामीण साहित्य'हे व डॉ.शिवाजी नागरे यांचे 'मराठीतील राजकीय कादंबरी' हे पुस्तक अशी दोन पुस्तके प्रकाशित झाली आहेत. तर या सत्रात 'साहित्य व सामाजिक शास्त्रांचा अंत:संबंध ' हे पुस्तक संपादित करण्यात आले. या पुस्तकाचे संपादन मराठी विभाग प्रमुख डॉ.शिवाजी नागरे यांनी केले. हे पुस्तक औरंगाबाद येथील चिन्मय प्रकाशनाने छापले.

**विद्यार्थ्याचे विविध कार्यक्रमातील फोटो (२०१०-११)**



मराठी विभागातील विद्यार्थ्याची बाबुजी देशमुख ग्रंथालयाला भेट




मराठी विभागांतर्गत आयोजित श्री बाबाराव मुसळे यांची प्रकट मुलाखत







मराठी विभागांतर्गत आयोजित शैक्षणिक सहल

लोणार सरोवर येथे आयोजित सहलीमध्ये पथनाटय सादर करताना विद्यार्थी

## विद्यार्थ्यांचे विविध कार्यक्रमातील फोटो (२०११-१२)





प्रश्नमंजुषा या कार्यक्रमात सहभागी मराठी विभागातील विद्यार्थी

प्रश्नमंजुषा या कार्यक्रमात सहभागी मराठी विभागातील विद्यार्थी







जिल्हास्तरीय सेमिनार स्पर्धेत मराठी वाङ्मयावरील समिनार सादर करताना कु.दिपाली हागे

जिल्हास्तरीय सेमिनार स्पर्धेत मराठी वाङ्मयावरील समिनार सादर करताना किशोर घरत




राष्ट्रसंतांच्या विचारातील 'गोवंशसुधार कल्पना' या विषयावरील सेमिनार



स्नेहसंमेलनात गीत सादर करताना मराठी वाङ्मयाची विद्यार्थीनी कु. शिरसाट